छाननी व तालिनीकरण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.:२०२५६२१३९८
Website:www.unipune.ac.in.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

Scrutiny & Tabulation Section
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एसॲण्डटी/७६० दिनांक :०९/१०/२०२०

**परिपत्रक क्र : १११ /२०२०**

**विषय :** विद्यार्थ्यांच्या नावात दुरुस्ती करण्याबाबत.

**संदर्भ :** १. मा. परीक्षा व मूल्यमापन ठराव क्र. ५३/२०१४, दि.१५.१२.२०१४
२. परिपत्रक क्र. ५३/२०१५, दि.१३.०३.२०१५
३. मा. परीक्षा व मूल्यमापन ठराव क्र. ८६/२०१६, दि. २१.१०.२०१६
४. मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा ठराव क्र.१३/२०१८, दि.०६.०२.२०१८
५. परीक्षा विभागाचे पत्र क्र.परीक्षा/अभि./१९७, दि.२१.०२.२०१८
६. परीक्षा विभागाचे पत्र क्र. परीक्षा/१०८६, दि. ०७.१०.२०१९.
७. मा. व्यवस्थापन परिषद ठराव क्र. म:०५/२२०१२० दि. २२ जानेवारी, २०२०.

विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यावर बऱ्याच कालावधीनंतर काही विद्यार्थ्यांकडून गुणपत्रकावरील व प्रमाणपत्रावरील नावामध्ये दुरुस्तीकरिता परीक्षा विभागाकडे विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्राप्त होत आहेत. यास अनुसरून प्राप्त आदेशानुसार सर्व संबंधितांना/विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, Eligibility चे अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी पुरेशी दक्षता बाळगणे आवश्यक आहे कारण, त्यांनी नमुद केलेल्या नावांचा समावेश संगणक प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रके, प्रमाणपत्र पदवीप्रमाणपत्रे व इतर दस्तऐवजांवर करण्यात येतो. विद्यार्थीहित विचारात घेता, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकामध्ये/प्रमाणपत्रामध्ये किरकोळ दुरुस्ती (Spelling Mistakes) करण्याची सुविधा विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात आली असून यासंदर्भात खालील कार्यपद्धती अवलंबिण्यात येत आहे.

१) परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत विद्यार्थ्यांच्या नावातील किरकोळ दुरुस्तीकरिता (Spelling Mistake) आवेदन पत्रे स्विकारली जातील. सदर आवेदनपत्रे विद्यार्थ्यांनी महाविद्यालये/संस्थामार्फत सादर करावीत.

२) निकाल जाहीर झाल्यानंतर निकालपत्रकांमध्ये कोणत्याही प्रकारे विद्यार्थ्यांच्या नावामध्ये वाढ अथवा कमी (Addition/Deletion) करण्याचे बदल होणार नाहीत.

४) भारतीय विद्यार्थ्यांच्या नावातील किरकोळ दुरुस्ती (Spelling Mistakes) ही, त्या त्या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक पात्रतेनुसार, म्हणजेच प्रवेशासाठी आवश्यक परीक्षेच्या गुणपत्रकावरील नावानुसार करण्यात येईल. याकरिता आवश्यक शैक्षणिक पात्रतेच्या (Eligibility Document) गुणपत्रकांच्या (जसे की एस.एस.सी./ एच.एस.सी./पदवी वा पद्व्युत्तर अभ्यासक्रमाची गुणपत्रके) साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. परदेशी विद्यार्थ्यांच्या बाबतीत नावातील दुरुस्तीकरिता पारपत्रावरील (पासपोर्ट) नाव ग्राह्य धरण्यात येईल.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

(महेश काकडे)
संचालक
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**